/

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६-अ करिता)**

क्र. पोमसं/८/६८०/ उपसहायक (१४-१५)/१४३/२०१५ (सीई ७२० ) मुंबई, दिनांक :-२७/०४/२०१६

**संदर्भ :-** शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे- १११५/ प्र.क्र. २९७/ पोल-१अ, दि.२६/०४/२०१६.

**-: आ दे श :-**

संदर्भाधिन, दि.२६/०४/२०१६ च्या शासन आदेशांन्वये पोलीस महासंचालकांच्या शहर लिपिक संवर्गातील व कार्यालयातील खालील नमूद **"वरिष्ठ कार्यालय अधीक्षक (गट-ब)"** दर्जाच्या अधिकाऱ्यांना **"पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गट-ब)"** या पदावर पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदोन्नतीवर कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून रकाना क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे (सोबत शासन आदेशांची प्रत जोडली आहे ). :-

| अ. क्र. | नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. दिलीप सदाशिव दळवी | पो.म.सं. कार्यालय, का.क्र. १७-अ | पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक ( र. व का. ) | रिक्त पदात |
| २. | श्री. अरविंद गणेश जाधव | महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालय | पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक ( पुनर्रचना ) | रिक्त पदात |

**प्रवीण दीक्षित,**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

श्री. दिलीप सदाशिव दळवी , वरिष्ठ कार्यालय अधीक्षक, का.क्र. १७-अ

श्री. अरविंद गणेश जाधव, वरिष्ठ कार्यालय अधीक्षक

(मार्फत :- महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई )

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पीअेच्वाय/१०८२/सीआर/११०० (२)/अेसईआर-३, दि. ०६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर वरिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत त्यांनी द्यावा, व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन ) नियम ११ (१) (अ) अन्वये केली जाईल यांची उपरोक्त वरिष्ठ कार्यालय अधीक्षकांनी नोंद घ्यावी .

..२..

३. उपरोक्त अधिकाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती, मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढे दाखल याचिका क्र. ८४५२/२००४, व याचिका क्र. ४७०/२००५ मधील अंतिम निर्णयांच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.
(लक्षवेध :- श्री. प्र. मो. बलकवडे, कक्ष अधिकारी, पोल-१अ )

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत माहिती व आवश्यक त्या तातडीच्या पुढील कार्यवाहीकरिता :-**

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)

२. यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या आस्थापनेवरील वरिष्ठ कार्यालय अधीक्षक, अरविंद गणेश जाधव यांना अन्य बदली अधिकारी हजर होण्याची प्रतीक्षा न करता विनाविलंब पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक (का. व सु.) / (आस्थापना) / (नि. व स.) , / लोहमार्ग /
प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) / (का. व सु.), म. राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई / वि. सु. वि., दादर, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक, का. व सु. / (नि. व स. / दक्षता), मुंबई
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ८, मुंबई
पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उपसहायक (निवृत्तीवेतन) / (आस्था-१), मुंबई.
पोलीस महानिरीक्षक यांचे सर्व उपसहायक (र. व का. वगळून )
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र. १ ते ४४
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे दोन महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

**( अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

**निवडसूची सन २०१४-१५**
**पोलीस महानिरीक्षक यांचे**
**“उपसहायक (गट-ब)” या पदावर**
**पदोन्नती देणेबाबत.....**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
शासन आदेश क्र: रापोसे-१११५/प्र.क्र.२९७/पोल-१अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :-२६ एप्रिल, २०१६.

**संदर्भ** :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र: पोमंस/८/६८० उपसहायक (१४-१५)/१४३/२०१५, दि.२४.०२.२०१६.

**शासन आदेश** :-

पोलीस महासंचालक कार्यालयातील “पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (गट-ब)” या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१४-१५ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या खालील “वरिष्ठ कार्यालय अधीक्षक (गट-ब)” दर्जाच्या अधिकाऱ्यांना, “पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (गट-ब)” या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | निर्देश सूचीतील/ ज्येष्ठता यादीतील अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव व प्रवर्ग | निवडसूचीवरील समावेशनाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ३ /७ | श्री. दिलीप सदाशिव दळवी (खुला) | खुला |
| २ | ४ /८ | श्री. अरविंद गणेश जाधव (अ.जा.) | खुला |
| ३ | ५/९ | श्री. श्रावण वामन दहाट (अ.जा./अपंग) | खुला |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत, महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. उपरोक्त अधिकाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र:८४५२/२००४ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

५. उपरोक्त अधिकाऱ्यांना पदस्थापना देताना, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

६. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४२६१४३५३८३६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2016.04.26 14:40:32 +05'30'

**(चारुशीला तांबेकर)**
**सह सचिव, गृह विभाग.**

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रतिलिपि,**

१) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (गृह) (शहर/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१२), मंत्रालय, मुंबई.
७) संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
८) निवडनस्ती (कार्या. पोल-१अ)